पुण्यनगरी

# राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ संघास रौप्य

**कोल्हापूर :** जम्मू विद्यापीठ, जम्मू येथे सुरू असलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फेन्सिंग (तलवारबाजी) स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या पुरुष संघाने सेबर प्रकारात रौप्यपदक पटकावले. पदकविजेत्या तलवारबाजी संघामध्ये धनंजय जाधव, आदित्य अंगल, साहिल गुर्जर, ओम जनजाल यांचा समावेश आहे. तसेच संघ व्यवस्थापक आणि प्रशिक्षक म्हणून कॅप्टन डॉ. राहुल मगदूम, प्रफुल्ल धुमाळ काम पाहत आहेत.

पुण्यनगरी

# सिद्धी जाधवची निवड



कोल्हापूर : उदयपूर राजस्थान येथे होणाऱ्या वेस्ट झोन आंतरविद्यापीठ महिला हॉकी स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ महिला हॉकी संघाच्या कर्णधारपदी सिद्धी संदीप जाधव हिची निवड झाली. सिद्धी ही शहाजी कॉलेजची विद्यार्थिनी आहे. तिला संदीप पाटील (इस्लामपूर), प्रशांत पाटील, प्रशांत मोटे, सागर जाधव, राहुल गावडे, संताजी भोसले, संतोष चौगुले यांचे मार्गदर्शन, तर हॉकी कोल्हापूरचे पदाधिकारी व सदस्यांचे प्रोत्साहन लाभले.

पुण्यनगरी

# गारगोटीत आज मराठी सहविचार सभा

मुदाळतिट्टा : समृद्ध मराठी शिक्षण अभियानांतर्गत दि. २४ रोजी मराठी विषय समिती सहविचार सभेचे आयोजन केले आहे. गारगोटी येथील उदाजीराव डी. एड. कॉलेज येथे होणाऱ्या या सभेत साहित्य अकादमी पुरस्कार विजेते लेखक डॉ. किरण गुरव यांची प्रकट मुलाखत, शिवाजी विद्यापीठ मराठी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांचे व्याख्यान होणार आहे. यासाठी प्राथमिक, माध्यमिक अध्यापकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन भुदरगडचे गटशिक्षणाधिकारी दीपक मेंगाणे यांनी केले आहे.

पुण्यनगरी

# भगवान महावीर अध्यासनास चौगुले यांची देणगी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आप्पासाहेब तात्यासाहेब चौगुले यांनी शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित इमारत बांधकामासाठी दहा हजार रुपयांची देणगी अध्यासनाचे डॉ. विजय ककडे यांच्याकडे सुपूर्द केली. आप्पासाहेब चौगुले हे जयसिंगपूर महाविद्यालयातील मराठी विषयाचे सेवानिवृत्त प्राध्यापक आहेत. देणगीबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आप्पासाहेब चौगुले यांचे आभार मानले.

सकाळ

# विठ्ठलराव पाटील महाविद्यालयाच्या खेळाडूंची निवड

कळे, ता. २३ : शिवाजी विद्यापीठात झालेल्या आंतरविभागीय रग्बी स्पर्धेतून भुवनेश्वर (ओडीसा) येथे होणाऱ्या आंतरविद्यापीठ राष्ट्रीय स्पर्धेसाठी येथील विठ्ठलराव पाटील महाविद्यालयाचे प्रणव विजय पाटील, अजय संजय पाचाकटे व शुभम शशिकांत पाटील यांची निवड झाली. वेणूताई चव्हाण कॉलेज कराड येथे झालेल्या आंतरविभागीय कुस्ती स्पर्धेत ५५ किलो गटात वैभव संभाजी पाटील याने सुवर्णपदक पटकावत विद्यापीठ संघातूनराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली. त्यांना डॉ. शरद बनसोडे यांचे प्रोत्साहन, प्रा. विक्रम यमगेकर यांचे मार्गदर्शन लाभले. प्राचार्य डॉ. कमलाकर राक्षसे, संस्थाध्यक्ष विठ्ठल पाटील, उपाध्यक्ष राहुल पाटील यांचे सहकार्य लाभले.